## दिनांक २५.१०.२०१० रोजीच्या जिल्हा सल्लागार समिती सभेचा इतिवृत्तांत

दिनांक २५.१०.२०१० रोजी दुपारी ०१.०० वाजता मा. श्री. श्याम वर्धने, जिल्हाधिकारी, सांगली यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा सल्लागार समिती सभेच्या कामकाजास सुरवात झाली. सभेस खालील नमूद केले अधिकारी व सभासद उपस्थित होते.

१. मा. श्री. श्याम वर्धने, जिल्हाधिकारी, सांगली
२. श्री. एस. डी. शेळके, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली.
३. श्री. पी. एस. कवठेकर, प्रादेशिक अधिकारी , म. औ. वि महामंडळ, सांगली.
४. श्री. एस. एस. वराळे, कार्यकारी अभियंता, म. औ. वि महामंडळ, सांगली.
५. श्री. एस.आर.जोशी, उपअभियंता, म.औ.वि.महामंडळ, सांगली
६. श्री. पी. एस. सावंत, अधीक्षक अभियंता,(आय.सी.) महावितरण, सांगली.
७. श्री. सु. वा. क्षीरसागर, कार्यकारी अभियंता,(प्रशासन) म. रा. विद्युत वितरण कंपनी,सांगली
८. श्री. एस. बी. कमलेकर, नगर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली
९. श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली
१०. श्री. बी.एस.पिरजादे, प्रतिनिधी, पोलीस मुख्यालय, सांगली
११. श्री. उदय पां. सरनाईक, सहा. प्रकल्प अधिकारी (उद्योग) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सांगली.
१२. श्री. एच. डी. माळगांवकर, मॅनेजर, वसंतदादा औद्योगिक वसाहत, सांगली
१३. श्री. एच. एस. पोतदार , जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडीया, सांगली.
१४. श्री . शिवाजी पाटील, चेअरमन, कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स, कुपवाड
१५. श्री . सतीश मालू, व्हा. चेअरमन, कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स, कुपवाड
१६. श्री . बी. एस. सुर्यवंशी, मॅनेजर, कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स, कुपवाड
१७. श्री. दिलीप घाटगे, माहिती अधिकारी, सांगली.
१८. श्री. एन.एच.नलवडे, सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, सांगली.
१९. श्री. गणेश निकम, मॅनेजर, सांगली मिरज एमआयडीसी मॅन्यु. असो.मिरज.
२०. श्री. एस. एच. नलवडे, असि. मॅनेजर, गो.म.औ.व. मिरज
२१ .श्री. आय. एस. उप्पीन, अध्यक्ष, जत एमआयडीसी उद्योजक संघटना, जत

२२. श्री. व्ही. एस. नाईक, प्रतिनिधी, महात्मा फुले मागास वर्गीय विकास महामंडळ, सांगली
२२. श्री. व्ही. एस. अनुसे, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली.
सभेत खालील प्रमाणे विषयवार चर्चा झाली.

| अ क्र | विषय | विषय कोणी उपस्थित केला | कार्यवाही करणारी संस्था/ कार्यालय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | दि.०२.०९.२०१० रोजी झालेल्या सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | इतिवृत्तांतावर उपस्थितांकडून आक्षेप व दुरुस्तीची मागणी न झाल्याने इतिवृत्तांत सर्व संमतीने कायम करण्यात आला. |
| २ | दि. ०२.०९.२०१० रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीची माहिती | | | |
| | १) जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजनांचा प्रगती अहवाल | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | २५ ऑक्टोंबर २०१० अखेरचा खर्चाचा अहवाल सभेपुढे वाचून दाखविण्यात आला.<br>उद्योजकता व तांत्रिक विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत **सर्वसाधारण प्रवर्गातील** खालील कार्यक्रम चालू झालेले आहेत.<br>**अ) मिरज** - १)टॅली, २)सीएनसी ऑपरेटर, ३)टर्नर, ४)वेल्डींग व फॅब्रीकेशन, ५)रीसेप्शनिस्ट ६) इंडस्ट्रीयल इलेक्ट्रीशीयन<br>**ब) पलूस -** १)फिटर, २)सीएनसी ऑपरेटर, ३)पेंटर<br>**क) कडेगांव -** १)रेडीमेड गारमेंट २)टेक्सटाईल विव्हर<br>**ड) तासगांव -** १)प्लंबिंग , २)युपीएस इन्व्हर्टर दुरुस्ती<br>**इ) कवठेमहांकाळ -** १)वेल्डींग , २)फॅब्रीकेशन<br>**फ) आटपाडी -** १)इलेक्ट्रीक मोटार रिवांयडींग, २)फॅब्रीकेशन. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | उद्योजकता व तांत्रिक विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील चालू होणारे कार्यक्रम खालील प्रमाणे आहेत.<br>**अ) वाळवा** - १)टू व्हीलर दुरुस्ती, २)रेडीमेड गारमेंट ६) वायरमन<br>**ब) शिराळा -** १)इलेक्ट्रीक मोटार रिवायंडीग २)रेडीमेड गारमेंट<br>**क) जत -** १) वेल्डींग अँड फॅब्रीकेशन २) इलेक्ट्रीक मोटार रिवायंडीग<br>**ड) विटा -** १) विव्हर्स २) इलेक्ट्रीशयन व मोटार रिवायंडींग<br>उद्योजकता व तांत्रिक विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत **विशेष घटक प्रवर्गातील** चालू होणारे कार्यक्रम खालील प्रमाणे आहेत.<br>**अ) तासगांव** - १)इले. मोटार रिवायंडींग<br>**ब) पलूस -** १) टर्नर<br>**क) वाळवा -** १)रेडीमेड गारमेंट<br>**ड) वाळवा -** १) मोटार रिवायंडींग<br>**इ) मिरज -** १) इलेक्ट्रीशियन, २) मोटार रिवायंडींग ३) युपीएस इन्व्हर्टर दुरुस्ती<br>**फ) कवठेमहांकाळ -** १) रेडीमेड गारमेंट<br>**ग) जत -** १)रेडीमेड गारमेंट<br>**म) सांगली -** फिटर, ॲटो इलेक्ट्रीशीयन<br>वरील सर्व प्रशिक्षण कार्यक्रम गुणवत्ता पूर्ण असावेत असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.<br>तसेच सर्व औद्योगिक संघटनांनी वर नमूद व्यवसायातून प्रशिक्षीत होणा-या प्रशिक्षणार्थींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन द्यावी व औद्योगिक संघटनानी त्यांच्या क्षेत्रातील सर्व घटकांना कळवून सदर प्रशिक्षणाच्या अंतिम टप्यात Campus Interview चे नियोजन करणेत यावे असे सूचीत केले. |
| | २) जिल्हा पुरस्कार योजना २०१० | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | जि. उ.केंद्र, सांगली | जिल्हा पुरस्कार २०१० अंतर्गत अर्ज प्राप्तीची कार्यवाही चालू आहे. सर्व औद्योगिक संघटनांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त उद्योजकांना या योजने अंतर्गत अर्ज करण्यास उद्युक्त करावे असे मा. अध्यक्षांनी सूचीत केले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३) बँकाकडून कर्ज प्रकरणे मंजूर करताना येणा-या अडचणी बाबत | मा.आमदार श्री. विलासरावजी शिंदे | जिल्हा अग्रणी बँक | सर्व बँकाचे शाखा व्यवस्थापक यांची दिनांक २२/१०/२०१० रोजी सभा संपन्न झाली. वरील सभेत सर्व शासकीय योजनांच्या प्रकरणांचा त्वरीत निपटारा करणे बाबत सर्व शाखांच्या अधिका-यांना जिल्हा अग्रणी बँक अधिकारी यांनी सूचीत केले. तसेच शासनाच्या योजनांची माहितीही देण्यात आली. विषय कमी करण्यात येत आहे. |
| | ४) सुक्ष्म लघु म मध्यम उपक्रम सुकरता परिषद नियम २००७ | जिल्हा उद्योग केंद्र, | जिल्हा उद्योग केंद्र, | या योजने अंतर्गत अद्याप अर्ज प्राप्त झालेला नाही .<br>ज्या घटकांकडून/संस्थेकडून येणे बाकी आहे अशा संस्था/घटकां विरुध्द अर्ज सादर केल्यास सदर घटकाकडून / संस्थेकडून पुन्हा काम मिळण्यासाठी अडचणी निर्माण होतील अशी बाब उद्योजकांनी मांडली. तरी सदर बाबत मा. जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने विकास आयुक्त (उद्योग) यांना अर्धशासकीय पत्र पाठविण्यात यावे असे मा. अध्यक्षांनी सूचीत केले. |
| | ५)सांगली जिल्हयातील मंजूर झालेले उद्योग समुह विकास प्रकल्प | जिल्हा उद्योग केंद्र, | जिल्हा उद्योग केंद्र, | सांगली ग्रेप प्रोसेसिंग रिसर्च इंडस्ट्रीज लि. सुभाषनगर (मालगांव) ता. मिरज, २) लकी लार्क इंटीग्रेटेड टेक्सटाईल अँड गारमेंट , गार्डी, ता.खानापूर या दोन क्लस्टरनां प्रकल्प उभारणीस (हार्ड इंटरव्हेंशनसाठी) मंजूरी प्राप्त झाली आहे. या दोन्ही प्रकल्पांचे नियोजन करण्याची कार्यवाही चालू आहे.<br>सदर प्रकल्पाच्या क्षमता वृध्दी कार्यक्रमा अंतर्गत (सॉफ्ट इंटरव्हेशन) रु.३.३० लाख पैकी रु.१.४० लाख खर्च झाले असून उर्वरीत रक्कम ३१ ऑक्टोंबर २०१० पर्यंत खर्च करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.<br>सांगली येथील हळद प्रक्रिया क्लस्टर व दुसरे बेदाणा क्लस्टरचा प्रस्ताव एसपीव्ही व मिटकॉनला तयार करणे बाबत कळविण्यात आले आहे अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी दिली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ६) सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अंतर्गत झालेल्या सुधारणा बाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, | जिल्हा उद्योग केंद्र, | दि.२.०९.२०१० च्या सभेत या योजने विषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे.<br><br>पात्र घटकांनी जिल्हा उद्योग केंद्राकडे दिनांक ३१/३/२०११ पर्यंत अर्ज करण्याबाबत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली यांनी आवाहन केले आहे. तसेच सदर शासन निर्णयाची माहिती www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१००७३११७४०११००९ असा आहे. अशी माहिती महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली यांनी दिली.<br><br>विषय कमी करण्यात येत आहे. |

सर्व उपस्थितांचे आभार मानले नंतर सभा समाप्त झाली.

महाव्यवस्थापक, जि.उ.के. सांगली.
सदस्य सचिव, जि.उ.मि. सांगली.

जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष, जि.स.समिती. सांगली

## दिनांक २५.१०.२०१० रोजीच्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचा इतिवृत्तांत

दिनांक २५.१०.२०१० रोजी दुपारी १.०० वाजता श्री. श्याम वर्धने, जिल्हाधिकारी, सांगली यांचे अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरवात झाली. सभेस खालील नमूद केले अधिकारी व सभासद उपस्थित होते.

१. मा. श्री. श्याम वर्धने, जिल्हाधिकारी, सांगली
२. श्री. एस. डी. शेळके, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली.
३. श्री. पी. एस. कवठेकर, प्रादेशिक अधिकारी , म. औ. वि महामंडळ, सांगली.
४. श्री. एस. एस. वराळे, कार्यकारी अभियंता, म. औ. वि महामंडळ, सांगली.
५. श्री. एस.आर.जोशी, उपअभियंता, म.औ.वि.महामंडळ, सांगली
६. श्री. पी. एस. सावंत, अधीक्षक अभियंता,(आय.सी.) महावितरण, सांगली.
७. श्री. सु. वा. क्षीरसागर, कार्यकारी अभियंता,(प्रशासन) म. रा. विद्युत वितरण कंपनी,सांगली
८. श्री. एस. बी. कमलेकर, नगर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली
९. श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली
१०. श्री. बी.एस.पिरजादे, प्रतिनिधी, पोलीस मुख्यालय, सांगली
११. श्री. उदय पां. सरनाईक, सहा. प्रकल्प अधिकारी (उद्योग) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सांगली.
१२. श्री. एच. डी. माळगांवकर, मॅनेजर, वसंतदादा औद्योगिक वसाहत, सांगली
१३. श्री. एच. एस. पोतदार , जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडीया, सांगली.
१४. श्री . शिवाजी पाटील, चेअरमन, कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स, कुपवाड
१५. श्री . सतीश मालू, व्हा. चेअरमन, कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स, कुपवाड
१६. श्री . बी. एस. सुर्यवंशी, मॅनेजर, कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स, कुपवाड
१७. श्री. दिलीप घाटगे, माहिती अधिकारी, सांगली.
१८. श्री. एन.एच.नलवडे, सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, सांगली.
१९. श्री. गणेश निकम, मॅनेजर, सांगली मिरज एमआयडीसी मॅन्यु. असो.मिरज.
२०. श्री. एस. एच. नलवडे, असि. मॅनेजर, गो.म.औ.व. मिरज
२१ .श्री. आय. एस. उप्पीन, अध्यक्ष, जत एमआयडीसी उद्योजक संघटना, जत

२२. श्री. व्ही. एस. नाईक, प्रतिनिधी, महात्मा फुले मागास वर्गीय विकास महामंडळ, सांगली
२२. श्री. व्ही. एस. अनुसे, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली.

सभेत खालील प्रमाणे विषयवार चर्चा झाली.

| अ क्र | विषय | विषय कोणी उपस्थित केला | कार्यवाही करणारी संस्था/ कार्यालय | कार्यवाही चा कालावधी | कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि.०२.०९.२०१० रोजी झालेल्या सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | | इतिवृत्तांत सर्व संमतीने कायम करण्यात आला. |
| २ | दि. ०२.०९.२०१० रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीची माहिती | | | | |
| | १. मिरज औ.व. व मिरज एमआयडीसी क्षेत्रातील अंतर्गत रस्ते | सांगली मिरज एमआयडीसी असो. मिरज | महानगरपालीका | डिसेंबर २०१० | सदर भागातील रस्ते पॅचवर्क करणेचे काम डिसेंबर २०१० अखेर पूर्ण करीत असल्याचे श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली यांनी सांगितले. |
| | २. वसंतदादा औद्योगिक वसाहत ते कुपवाड एमआयडीसीला जोडणारे रस्ता | वसंतदादा औ. व. | महानगरपालीका | डिसेंबर २०१० | सदर भागातील रस्ते पॅचवर्क करणेचे काम डिसेंबर २०१० अखेर पूर्ण करीत असल्याचे श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली यांनी सांगितले. |
| | ३. वसंतदादा औद्योगिक वसाहतीमधील अंतर्गत रस्ते | वसंतदादा औ. व. | महानगरपालीका | -- | सदर कामे जागेवर पहाणी करून महत्वाच्या ठिकाणच्या कामाचे रू.२८२४१४९/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये वसंतदादा औद्योगिक वसाहत अंतर्गत रस्ते व गटारीच्या कामकाजाकरिता रू.२५०००००/- ची तरतुद ठेवणेत आली असून रितसर मंजुरीअंती कार्यवाही सुरू करणेत येत आहे. श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली यांनी सांगितले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ४. कुपवाड औद्योगिक क्षेत्रास कुपवाड शहरामार्गे सांगली कडून जाणा-या रस्त्यांची दुरुस्ती | कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंड अँड कॉमर्स | महानगरपालीका | १५.११.१० | सदर कामापैकी लक्ष्मी देऊळ ते सुतगिरणी पर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पुर्ण झाले आहे असे श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली यांनी सांगितले. सुतगिरणी ते कुपवाड जकात नाक्यापर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम १५ नोव्हेंबर २०१० पर्यंत पूर्ण करावे असे मा. अध्यक्षांनी सूचीत केले. |
| | ५. वसंतदादा औद्योगिक वसाहत सहकारी संस्था मधील ४० फुटी रस्ता | वसंतदादा औ. व. | महानगरपालीका | -- | झाडे तोडण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून इलेक्ट्रिक पोल शिप्टींग बाबत म.रा.वि. कंपनीस पत्र पाठविणेत आले होते. त्यानुसार त्यांचेकडून प्राप्त कोटेशन नुसार रू.२१०००/- म.रा.वि.वि.कंपनीकडे भरणेबाबत प्रशासकीय मान्यता झाली असून पुढील कार्यवाही पुर्णे होताच सदर रकमेचा भरणा म.रा.वि.वि.कंपनीकडे करणेत येत आहे असे श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली यांनी सांगितले. तथापि रक्कम रु.२१,०००/- चा आजच्या आज भरणा करण्यात यावा असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले. |
| | ६. वसंतदादा औद्योगिक वसाहतीमध्ये ड्रेनेजची व गटारीची व्यवस्था करणे बाबत | वसंतदादा औ. व. | महानगरपालीका | -- | याबाबत संबधीत औद्योगिक वसाहतीच्या जागेस प्रत्यक्षात लवकरच भेट देवून आवश्यक कामे अंतिम करून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे असे श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली यांनी सांगितले. |
| | ७. मिरज एमआयडीसी कडे येणा-या रस्त्यांचे पॅचवर्क बाबत | सांगली मिरज एमआयडीसी मॅन्यु.असो. | महानगरपालीका सांगली | डिसेंबर २०१० | सदर भागातील रस्ते पॅचवर्क करणेचे काम डिसेंबर २०१० अखेर पूर्ण करीत असल्याचे श्री. डी. एस. जाधव , शहर अभियंता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालीका सांगली यांनी सांगितले. |
| | ८. वसंतदादा औ. वसाहतीमधील भूखंड क्र.५७६ वर महापालीकेने | वसंतदादा औ.व. | महानगरपालीका | -- | सदर क्षेत्रावरील आरक्षणा बाबत महानगरपालीकेने त्यांचे वरीष्ठाकडे पाठपुरावा करुन आरक्षण रद्द करणेबाबत प्रयत्न करावेत असे मागील |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | घातलेले कार्ट पार्कींगचे बंधन काढून बांधकाम परवानगी मिळणेबाबत | | | | सभेत ठरले होते.<br>सदर बाबत महानगरपालीकेस मा. जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने पत्र पाठविण्यात यावे असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले. |
| | ९.गो.म.औ.व. मिरज क्षेत्रातील भुईभाडे कराराबाबत | गो.म.औ.व. | गो.म.औ.व. | --- | जिल्हाधिकारी कार्यालय (चिटणीस शाखा) यांना पुढील कार्यवाही त्वरीत करणेबाबत सूचना दिल्या. |
| | १०. एमआयडीसी मिरज क्षेत्रामध्ये पोलीस चौकी सुरु करणे बाबत | सांगली मिरज एमआयडीसी असो. मिरज | | | सदर बाबत म.औ.वि.महामंडळाने पोलीस अधीक्षक, सांगली यांना दिनांक ४.९.२०१० चे पत्रानुसार एमआयडीसी क्षेत्रामध्ये पोलीस बीट कार्यान्वीत करणेबाबत कळविले आहे. |
| ३ | मा. अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे | | | | |
| | १. सांगली - कुपवाड एमआय डीसी बसस्टॉप सुशोभित व अंतर्गत बस सेवा सुरु करणेबाबत | कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंड. | विभाग नियंत्रक, म.रा.परीवहन मंडळ | - | सांगली - कुपवाड एमआयडीसी वेगाने डेव्हलप होत आहे. एमआयडीसी वाढल्यामुळे जुने बसस्टॉप सुशोभित करणे आवश्यक आहे. तसेच कामगारांची वाहतूक वाढणेसाठी सांगली व मिरज मार्गे जाणा-या गाड्या एमआयडीसी मध्ये वळवाव्यात. मार्ग :- चाकण समोरुन, दत्तनगर या वळसा मारुन स्कायलार्क मार्गे मेनन पिस्टन समोरुन मिरज अशी जावी व यावी तसेच बसेसच्या फे-या वेळ ठरवून वाढवून देण्यात याव्यात अशी मागणी कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्टीज अँड कॉमर्स यांनी केली.<br>सदर बाबत विभाग नियंत्रक, म.रा.परीवहन मंडळ, सांगली यांना सभेच्या वतीने पत्र पाठविण्यात यावे असे मा. अध्यक्षांनी सूचीत केले. |
| | २) जकात नाक्यावर होणा-या गैरव्यवहारा बाबत | कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंड. | महानगरपालीका | | कुपवाड एम.आय.डी.सी.मध्ये उद्योजकांचा माल येतांना ट्रक बरोबर पक्के बिल येत असते. ट्रक जकात नाक्यावर आले नंतर जादा रक्कमेची मागणी केली जाते. जादा रक्कम न दिलेस रहदारी पावती दिली जात नाही. रहदारी पावती न देता डिपॉझीटची मागणी केली जाते व जादा रक्कम दिलेशिवाय एकही गाडी सोडली जात नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | हा उद्योजकांना होणारा त्रास कमी व्हावा अशी मागणी कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स, कुपवाड यांनी केली.<br>याबाबत मा. अध्यक्षांचे स्वाक्षरीने आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालीका, सांगली यांना कळविणेबाबत सूचीत करण्यात आले. |

सर्व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाली.

महाव्यवस्थापक, जि.उ.के. तथा
सदस्य सचिव, जि.उ.मि. सांगली.

जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष, जि.उ.मि. सांगली

**दिनांक २५.१०.२०१० रोजीच्या जिल्हा स्तरीय आजारी उद्योग पुर्नवसन समिती सभेचा इतिवृत्तांत**

दि . २५.१०.२०१० रोजी १.३० वाजता मा. श्री. श्याम वर्धने, जिल्हाधिकारी, सांगली यांचे अध्यक्षतेखाली आयोजित जिल्हा स्तरीय आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभेस उपस्थितांचे सदस्य सचिवांनी स्वागत करुन मा.अध्यक्षांचे संमतीने सभेच्या कामकाजास सुरवात केली. सभेस खालील नमूद अधिकारी व सभासद उपस्थित होते.

१. मा. श्री. श्याम वर्धने, जिल्हाधिकारी, सांगली
२. श्री. एस. डी. शेळके, मंहाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली
३. श्री. एच.एस.पोतदार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडीया, सांगली.
४. श्री. बी. एम. रामदुर्ग, उपव्यवस्थापक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सांगली.
५. एस. एन. सावंत, सिनिअर ऑफीसर, सांगली जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सांगली.
६. एस. ए. कदम, व्हा. चेअरमन, दि विकास इंडस्ट्रीज को ऑप. ऑर्गनायझेशन लि. पलूस.
७. श्री.व्ही. एस. अनुसे, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली.

सभेत खालील प्रमाणे विषयवार चर्चा झाली.

| अ क्र | विषय | विषय कोणी उपस्थित केला | कार्यवाही करणारी संस्था/ कार्यालय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | दि.०२.०९.२०१० रोजीच्या सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | इतिवृत्तांतावर उपस्थितांकडून आक्षेप व दुरुस्तीची मागणी न झाल्याने इतिवृत्तांत सर्व संमतीने कायम करण्यात आला. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | दि विकास इंडस्ट्रीयल को ऑप. ऑर्गनयझेशन लि. पलूस  या बंद पडलेल्या युनिटला परत पूर्ववत सुरु करणेकामी चर्चा करणे | दि विकास इंडस्ट्रीयल को ऑप. ऑर्गनयझेशन लि. पलूस | जिल्हा उद्योग केंद्र, सांगली | दि विकास इंडस्ट्रीयल को ऑप. ऑर्गनयझेशन लि. पलूस   यांनी त्यांचे बंद पडलेले युनिट परत सुरु करणेकामी या कार्यालयाकडे दिनांक २१.१०.२०१० रोजी अर्ज केला आहे.<br>संस्थेचा कारखाना पलूस येथे असून सन १९९३ मध्ये आजारी उद्योग म्हणून घोषित करण्यात आला आहे. बंद पडलेल्या संस्थेने यापूर्वी DCC बँकेकडून घेतलेले एकूण रु.७८.०० लाख कर्ज व्याजासह थक होते. संस्थेने कारखाना चालू करणेसाठी बँकेकडे सहकार्य मागितले. त्यावेळी बँकेशी झालेल्या चर्चेनुसार संस्थेची कारखाना साईट सोडून संस्थेच्या मालकीची १४० आर रिकामी जागा विकून बँकेचे थकीत कर्ज व इतर देणी भागविणेचे ठरविण्यात आले होते. संस्थेने   सर्व मालमत्ता  बँकेला मॉर्गेज करुन दिली. संस्थेने सदर जागेचे प्लॉट पाडून प्लॉट पध्दतीने विक्री करण्याचे नियोजन केलेले होते.या जागेचे सुमारे १ कोटी ७५ लाख  रुपये या विक्रीतून संस्थेस मिळणार होते. त्यासाठी संस्थेने बँकेला रु.३०.०० लक्ष भरणेचे व पुढे थकीत कर्जाचे हप्त्याने करणेबाबत पत्र दिले. परंतु बँकेने त्याचा विचार न करता सदर विक्री प्रक्रिया पूर्ण केली. संस्थेने बँकेचे सिक्यु. ॲक्ट  खालील विक्री प्रक्रियेचे विरोधात डी.आर.टी. कोर्ट पुणे येथे केस दाखल करुन या व्यवहारास स्थगितीचा आदेश सदर कोर्टाकडून प्राप्त करुन घेतला असून सध्या ही बाब न्याय प्रविष्ट आहे. तथापि संस्थेचा बंद पडलेला कारखाना लवकरात लवकर सुरु करणेसाठी बँकेमार्फत सवलत देण्यात यावी असे संस्थेने कळविले आहे.<br>सदर बाबत बँकेचे अधिकारी यांनी  सदर घटकास एक रकमी परतफेड (OTS) देणे संदर्भाने आवश्यक ते सहाकार्य करावे व उद्योग सुरु होणेसाठी प्रयत्न करावेत असे असे मा. अध्यक्षांनी सूचीत केले. |

सर्व  उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाली.

सही-
महाव्यवस्थापक, जि.उ.के. तथा
सदस्य सचिव, जि.स्त.आ.उ.स. सांगली.

सही-
जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष, जि. स्त.आ.उ.स. सांगली.